कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता व विमा काढणेबाबत

शासन परिपत्रक क्रमांक:- चौविआ-२०२०/प्र.क.४२/वित्त-४
ग्राम विकास विभाग,बाधकाम भवन, मुंबई
दिनांक:- ३१ मार्च, २०२०

परिपत्रक

सध्या कोरोना या विषाणूचा संपुर्ण जगात प्रादुर्भाव झाला आहे. राज्यात या विषाणुचा फैलाव होऊ नये यासाठी केंद्रशासन तसेच राज्य शासनाकडून युध्दपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने जगभरात चिंतेचे वातावरण आहे. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र तसेच राज्य शासनाने वेगवेगळया उपाययोजना केलेल्या आहेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव तत्परतेने युध्दपातळीवर रोखण्यासाठी शासनाने वेगवेगळया उपाययोजना सुरु केल्या आहेत. ग्रामीण पातळीवर देखील सदर विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्राम विकास विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत. या संदर्भात मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत मा. मुख्यमंत्र्यानी दिलेल्या निर्देशास अनुसरून ग्रामीण पातळीवर कोरोना विषाणुचा फैलाव रोखण्यासाठी मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्रामविकास यांनी दि. १३ मार्च, २०२० च्या आणि दि.२४ मार्च, २०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने ग्राम पंचायत स्तरावर सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी/मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या व अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती यांच्या मार्फत लोकांमध्ये जनजागृती,स्वच्छता मोहिम राबविणे, आरोग्याची काळजी घेणे इत्यादी कामे अहोरात्र मेहनत घेवून जिवाची पर्वा न करता करीत आहेत.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या अनुसूची १,ग्रामसूचीमध्ये कलम ४५ अन्वये विविध कामांचे विषय दिलेले आहेत. त्यामधील सध्याच्या परीस्थीतीत खालील विषयावर काम करण्यात येत आहे.

अ.क्र. १४- अपंग, निराश्रित आणि आजारी असलेल्याना सहाय्य देणे.

अ.क्र.२४- आरोग्य रक्षण व सुधारणा

अ.क्र. २५- कोणत्याही संक्रमक रोगाचा उद्रेक, फैलाव किंवा पुनरूद्भवन होण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे,

Scanned with CamScanner

अ.क्र.७५- कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली असता रहिवाश्यांना सहाय्य देणे इत्यादी विषय हातळण्यात येतात.

वरील बाबी ह्या कामाचा भाग असल्या तरी देखील सदर कर्मचारी हे आपल्या जिवाची जोखीम पत्कारून ही कामे करीत असल्याने त्यांना मिळण्याऱ्या नियमित वेतन/मानधन व्यतिरिक्त त्यांना रू. १०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्यात यावी.

३. तसेच केंद्रशासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि.३० मार्च,२०२० च्या पत्रान्वये COVID-१९ या विषाणुच्या विरोधात लढा देण्याऱ्या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यासाठी "प्रधानमत्री गरीब कल्याण पॅकेज" अंतर्गत New India Assurance Company मार्फत ९० दिवसासाठी रू. ५० लाखाचा विमा उतरविला आहे. त्याच धर्तीवर ग्रामपंचायती अंतर्गत वर परिच्छेद २ मध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांचा ९० दिवसासाठी रू. २५ लाखाचा विमा जिल्हा परिषद स्तरावर उतरविण्यात यावा.

४. उपरोक्त दोन्ही योजनांसाठी येणारा खर्च हा खालील प्राधान्य क्रमानुसार भागविण्यात यावा. (अनुक्रमांक १ मधील रक्कम पुर्णत: खर्ची पडल्यानंतरच अनुक्रमांक २ मधील रक्कम वापरावी व याच पध्दतीने अनुक्रमांक १ व अनुक्रमांक २ मधील रक्कम संपल्यानंतर अनुक्रमांक ३ मधील रक्कम वापरावी. आाणि अनुक्रमांक १ अनुक्रमांक २ व अनुक्रमांक ३ मधील रक्कम संपल्यानंतर अनुक्रमांक ४ वरील रक्कम वापरावी.)

१. १४ व्या वित्त आयोगाच्या निधीवरील बँक खात्यात जमा व्याज रक्कम
२. १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत मागील ५ वर्षातील शिल्लक असलेला अखर्चित निधी
३. शासन निर्णय क्रमांक जिपीडिपी २०१९/प्र.क्र.३८/पंरा-६,दि.२८ मे, २०१९ मधील मुद्दा क्रमांक ३.६ मध्ये नमुद केल्यानुसार आरोग्य, उपजिवीका (livelihood) यासाठी वित्त आयोगाच्या निधीतील २५% तरतूद
४. जिल्हा परिषद सेस फंड

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pravin Jain

(प्रवीण दे.जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त, कोकण/ नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

Scanned with CamScanner

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
उप सचिव (पंचायत राज), ग्रामविकास विभाग मुंबई
निवडनस्ती कार्यासन वित्त-४

प्रत माहितीसाठी
मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक

Scanned with CamScanner